Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# छत्रपती शिवाजी महाराजांची शेतसारा आकारणी पध्दत



**प्रा.राजेंद्रसिंग हिरासिंग देवरे**
प्रमुख, इतिहास विभाग
श्री व्यंकटेश महाविद्यालय देऊळगाव राजा, जि. बुलडाणा
Email : devare.raj@rediffmail.com

## सारांश

'शेतकरी गरीब तर राजा गरीब आणि राजा गरीब तर राज्य गरीब' या तत्कालीन अर्थनीतीनुसार शिवाजी महाराजांनी राज्याच्या दृष्टीने शेतक—यांचे महत्त्व ओळखले होते. म्हणून त्यांनी परंपरागत चालत आलेल्या व्यवस्थेनुसार कार्यरत जमीन महसूलाशी संबंधित अधिका—यांचा बंदोबस्त करून शेतक—यांना अधिकची जमीन लागवडीखाली आणण्यासाठी आर्थिक मदत केली, मात्र जोपर्यंत शेतसारा आकारणी व वसूलीच्या संदर्भातील शेतक—यांचे प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत शेती उत्पादनात वाढ होणार नाही, याची पूर्णपणे जाणिव असल्याने शिवाजी महाराजांनी प्रचलित शेतसारा आकारणी पध्दतीत परिवर्तन करण्याचे ठरविल्याचे दिसते.

नवीन पध्दतीने शेतसारा निश्चित करण्यापूर्वी प्रथम अंदाज पत्रक तयार केले जाई. त्यानंतर गावक—यांच्या सहकार्याने जमिनीची मोजणी करून प्रतवारीनुसार पिक पाहणी आणि त्यानंतर उत्पादनाचा अंदाज घेऊन सारा आकारणी करण्यात येत असे. या सारा आकारणीत आपल्यावर अन्याय झाला, अशी शेतक—याची तक्रार असेल तर त्यामध्ये दुरूस्ती करून पुन्हा नव्याने शेतसारा आकारणी करून शेतक—यांची तक्रार दूर करण्याची तरतूद होती. साधरणतः एकूण उत्पादनाच्या 2/5 (40%)

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

सारा आकारणीचे प्रमाण होते. नगदी आणि जिन्नस स्वरूपात सारा वसूल केल्या जाई. या संदर्भात शेतक–यांवर अन्याय होऊ नये, अशी शिवाजी महाराजांची आपल्या अधिका–यांना असलेली सक्त ताकीद आणि संकट काळात शेतक–यांना शेतसारा आकारणीतून सुट देण्याचे धोरण, यामुळे महाराजांची ही नवीन शेतसारा आकारणी पध्दत अधिक लोकाभिमूख झाल्याचे दिसते.

**KEYWORDS :** भारत, छत्रपती शिवाजी महाराज, शेतसारा, आकारणी पध्दत, ज्ञान

## RESEARCH PAPER

### प्रस्तावना :

प्राचीनकाळापासून भारतातील बहुसंख्य जनतेच्या उदरनिर्वाहाचे शेती हेच प्रधान साधन असून शेतीपासून मिळणारा 'सारा' हाच राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य श्रोत असल्याने राज्याच्या दृष्टीने शेती व शेतक–यांचे महत्त्व छत्रपती शिवाजी महाराज जाणून होते. मात्र, हिच रयत दुष्काळाचे फेरे, वतनदाराकडून होणारी पिळवणूक व परचक्राच्या प्रसंगी होणारी जाळपोळ व लुटालूट या संकटाच्या वरवंटयाखाली भरडली जात होती.[1] अशा विपन्नावस्थेतून रयतेला बाहेर काढण्यासाठी शिवाजी महाराजांनी 'रयतेचे कल्याण' हे आपल्या प्रशासनाचे मुख्य ध्येय बनवून मुजोर वतनदार व अधिका–यांना वठणीवर आणून शेतक–यावर अन्याय होणार नाही, अशी व्यवस्था केली. शेती उत्पादन वाढीसाठी शेतक–यांना मदत केली. उपज क्षमतेनुसार जमिनीची वर्गवारी करून उत्पादनावर आधारित शेतसारा आकारणी करण्याचे धोरण स्वीकारले. सारा आकारणी करताना तो शेतक–याच्या हितास पोषक ठरेल, असा घेतला जाऊ लागला आणि त्यामध्ये जनतेचा सहभाग असल्याने डॉ. बाळकृष्ण यांनी शिवकालीन शेतसारा पध्दतीला ''लोकांची धारा पध्दती'' म्हटले आहे.[2] प्रिंगल म्हणतो की, ''शिवकाळात शेतक–याला कर कसा द्यायचा याचे ज्ञान होते आणि तो कर ते जबरदस्तीशिवाय देत असावेत.''[3] यावरून शिवाजी महाराजांची शेतसारा आकारणीची पध्दत कशी असेल, याची आपणास कल्पना येते.

### शोध निबंधाची उद्दिष्टये :

'छत्रपती शिवाजी महाराजांची शेतसारा आकारणी पध्दत' या शोध निबंधाची उद्दिष्टये पुढील प्रमाणे.

1) शिवपूर्वकालीन जमीन महसूल व्यवस्थेचा अभ्यास करणे .

2) शिवाजी महाराजांच्या जमीन महसूल व्यवस्थेचा अभ्यास करणे.

3) शिवाजी महाराजांचे शेतक–यांप्रती असलेले धोरण जाणून घेणे.

### संशोधन पध्दती :

सदर शोधनिबंधासाठी इतिहासामध्ये प्रचलित संशोधन पध्दतीपैकी 'संदर्भ पध्दती' चा वापर करण्यात आला असून या संशोधन पध्दतीत संदर्भ साधनांना अतिशय महत्त्वाचे स्थान असल्याने प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

### वतनदारांचा बंदोबस्त :

स्वराज्याची स्थापना करण्यापूर्वी जमीन महसूल व प्रांताची व्यवस्था पाहणारा एक वंशपरंपरेने चालत आलेला अधिकारी वर्ग महाराष्ट्रात अस्तित्वात होता. हा अधिकारी वर्ग म्हटला म्हणजे परगण्याचे वतनदार देशमुख, देशपांडे, पाटील व ग्रामलेखक होय.[4] या

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

वतनदार अधिका—यांपैकी राजकीयदृष्टया महत्त्वाचे अधिकारी म्हणजे देशमुख व देशपांडे, या वतनदार अधिका—यांकडे प्रांतातील शेकडो खेडयातील कुळंब्याकडून जमीन महसूल वसूल करणे व त्याचा भरणा सरकारी खजिण्यात करणे, ही कामे होती. त्यामुळे या वतनदार अधिका—यास विशेष प्रकारचे महत्त्व प्राप्त झाले होते.[5] मुसलमानी रियासतीत महालातील जमिनीचा महसूल रयेकडून वसूल करण्याचा मक्ता 'मोकासदार' या अधिका—यास देण्याची प्रथा होती. या प्रथेचे राजव्यवस्थेवर कशाप्रकारे परिणाम होतील याची जाणिव शिवाजी महाराजांना असल्यामुळे त्यांनी मोकासा पध्दत बंद केली. कारण, मोकासा पध्दतीत जमीन महसूल वसूल करणा—या अधिका—याचे 'तनखे' हे रोख न देता मोकासदारांना मिळालेल्या जमिनीच्या उत्पन्नातून दिले जात होते. हे मोकासदार आणि जमिनदार एकमेकास सामिल होऊन प्रचलित राजसत्तेविरूध्द बंड करण्यास प्रवृत्त होत.[6] या कारणास्तव शिवाजी महाराजांनी मोकासदार आणि वतनदार यांना कशा पध्दतीने वटणीवर आणले, हे सांगताना सभासद म्हणतो, ''त्यास राजियाने देश काबीज करून हुडे, वाडे, कोट पाडिले. नामांकित कोट जाहला तेथे ठाणे छेविले आणि मिरासदाराच्या हाती नाहिसे ठेविले. असे करून मिरासदार इनाम इजारतीने मनास मानेसारखे आपण घेत होते ते सर्व अनामत करून गल्ला व नख्त गाव पाहून देशमुखास व देशकुलकर्णी यास व पाटील कुळकर्णी यांसी हक्क बांधून दिला. जमिनदारांनी वाडा बुरजाचा बांधू नये, घर बांधून रहावे, ऐसा मुलकाचा बंद केला.''[7] अशा पध्दतीने मोकासदार आणि जमिनदार यांचे वर्चस्व नाहिसे करून राजसत्ता व रयतेची त्यांच्या कैदेतून मुक्तता केली आणि आपल्या लोकाभिमूख प्रशासनाचा पाया घातला.

**शेतक—यांना मदतीचे धोरण :**

वतनदार आणि जमिनदार यांचा बंदोबस्त झाला, तरी राज्य संरक्षण आणि वृध्दीसाठी शेती व्यवसायात वाढ होणे गरजेचे होते, कारण 'शेतकरी गरीब तर राजा गरीब आणि राजा गरीब तर राज्य गरीब' ही त्या काळची अर्थनीती असल्याने त्यास अनुसरूनच धोरण आखणे गरजेचे होते. म्हणून शिवाजी महाराजांनी ''ज्याची शेत कसावयास कुवत आहे आणि त्याला जोतास बैल, नांगर आणि पोटास दाणा नाही. त्यावीज तो अडोण निकामी जाला असेल, तरी त्याला रोख पैके हाती देऊन दो चौ बैलाचे पैके द्यावे, बैल घेवावे. बैलाचे आणि गल्याचे पैसे वाढी दिढी न करता मुदल उसणे हळूहळू याचे वानगी माफीक घेत घेत उसूल घ्यावा. जोवरी त्याला तवानगी येई तोवरी वागवावे''[8] अशा पध्दतीने गरजू शेतक—यांना बैल जोडी विकत घेण्यासाठी बिनव्याजी कर्जाऊ रक्कम देऊन ती मुद्दल रक्कम शेतक—यांच्या सवडीप्रमाणे हप्त्याहप्त्याने वसूल करावेत असे आदेश आपल्या अधिका—यांना दिले. तसेच ''नवी रयत येईल त्यास गुरे ढोरे द्यावीत. बीजास दाणा पैका द्यावा, तो ऐवज दोहो चाहो वर्षानी ऋणकोची ऐपत पाहून घ्यावा.'' सभासद म्हणतो, नवीन रयतेने वस्ती करावी म्हणून शिवाजीच्या राज्यात अशाप्रकारे प्रोत्साहन दिल्या जात असे. बाजारपेठ बसविण्यासाठी शिवाजीचा मंत्री मोरोपंत पिंगळे याजकडून करमुक्त जमीनी दान दिल्या जात.[9] आपत्काळात लोकांना जनावरे, अवजारे, धान्य घेण्यासाठी रोख रक्कम सरकारातून देण्याची (तगाई) पध्दत स्वीकारून सदर रक्कम हप्तेबंदीने परत देण्याचे निश्चित करण्यात आले.[10] या सुधारणावदी आणि शेतक—यांचे हित जोपासणा—या पध्दतीमुळे शेतक—यांना आर्थिक

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

सहाय्य दिले तरी, जोपर्यंत सारा आकारणी संदर्भातील प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत शेतकरी अधिक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी प्रयत्न करणार नाही आणि उत्पादनातही वाढ होणार नाही. याची जाणिव असल्याने शिवाजी महाराजांनी प्रचलित सारा आकारणी पध्दतीत परिवर्तन केल्याचे दिसून येते.

## जमिनीचे विभाजन :

तत्काळात गावच्या शिवाराचे दोन प्रमुख भाग होते. एक वसाहतीची जागा, तिला 'पांढरी' असे म्हणत आणि दुसरी नांगरणीची जागा तिला 'काळी' असे म्हणत. या काळीचे दोन प्रमुख भाग (1) प्रत्यक्ष लागवडी खालील जमीन (2) वाजट जमीन. वाजट जमिनीचा काही भाग हा गावच्या कुरणासाठी, जत्रेसाठी आणि बाजार इत्यादी सार्वजनिक कार्यासाठी वापरला जात असे. या वाजट जमिनीस लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न सतत चालू असे. सर्व जमीन ही राजाच्या मालकीची असली, तरी ती कसण्याचे काम राजा स्वतः करू शकत नसल्याने त्या जमिनीचे मालकी हक्क तो गावक—यास देई व त्याच्या मोबदल्यात त्यांच्याकडून खंड घेई. वतनदार, मिरासदार आणि बलुतेदार हे जमिनीचे मालक बनत. साधारणतः गावची 20% जमीन ही वतनदाराच्या कब्जात होती, असे दिसते.[11]

## जमीन माजणीची पध्दत :

शिवाजी महाराजांनी जमिनीचा सारा निश्चित करण्यापूर्वी जमिनीची मोजणी करून त्या प्रमाणे सारा आकारला. जमीन मोजणीसाठी एक काठी वापरली त्यास 'शिवशाही काठी' म्हणत. या काठीच्या लांबीविषयी सभासद बखरीत म्हटले आहे.

> ''पांच हात पांच मुठीची काठी, हात चवदा तसूच असावा हात मुठी मिळून बैंशी तसूची लांबी काठीची. वीस काठया औसर चौरस त्याचा बिघा एक. बिघे एकशेवीस यांचा एक चावर , अशी जमीन मोजून, आकारून गांवची गांव चौकशी केली.''

या काठीची लांबी सर्व ठिकाणी सारखीच होती असे दिसत नाही. काही ठिकाणी 82 तसूच्या ऐवजी 84 तसूंची काठी असल्याचे दिसते. कोकणात काठीला 'पांड' असे म्हणत. एका बिघ्यात 20 औरस —चौरस पांडाऐवजी 23 औरसचौरस पांडा मोजीत. काठीने जमीन मोजताना काठी उडत असल्याने प्रत्येक बिघ्यात सारखी जमीन येत नसे. जमीनीच्या या मोजणीला 'बिघावणी' असे म्हणत.[12]

## अंदाज पत्रक तयार करणे :

जमीन मोजणी झाल्यानंतर सारा आकारणी करताना जमीनीचे वर्गिकरण करून सारा वसूली संदर्भातील अंदाज पत्रक तयार तयार केले जात असे. अण्णाजी दत्तो यांनी हे काम देशमुख, देशपांडे परगण्याचे अधिकारी आणि गावकरी यांच्याकडे सुपूर्द केले होते. ब्राम्हण किंवा प्रभू कारकून मंडळी जर या कामासाठी नियुक्त केली असती, तर त्यांच्या स्थानिक परिस्थितीच्या अज्ञानामुळे हे काम योग्यरित्या होणार नाही, अशी भीती वाटत होती. म्हणून देशमुख, देशकुलकर्णी, पाटील व कुलकर्णी आणि गावाचे चार प्रतिष्ठित रयत यांनी 'एक विचाराने गावचा गाव फिरोन' हे सारा आकारणीचे काम करत असत. गावच्या लोकांचाही यात समावेश केल्याने डॉ. बाळकृष्ण यांनी अण्णाजी दत्तोच्या या सारा आकारणी पध्दतीला 'लोकांची धारा पध्दती' असे

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

म्हटले आहे.[13]

## सारा निश्चिती व आकारणी पध्दत :

शिवकालीन धारा किंवा सारा निश्चित करण्याचे एकूण तीन प्रयत्न झाले. अगदी प्रारंभी म्हणजे दादोजी कोंडदेवाने केलेला प्रयत्न होय. पुणे, मुठे व मावळ या भागात धारा ठरविण्याचे काम 1636 च्या सुमारास त्याने केले होते. दुसरा प्रयत्न मोरो त्रिंबक पिंगळे याने 1648–49 च्या वर्षात शिरवळ परगण्यात केला. तिसरा प्रयत्न अण्णाजी दत्तो सुरनीस या शिवाजी राजाच्या मंत्र्याने केला. 1678 साली रोहिडखोरे परगण्याच्या अधिका–यांना त्याने जो एक 'कौलनामा' दिला आहे. यावरून त्याच्या पध्दतीची कल्पना येते. राज्यसरकार परगण्याचे अधिकारी आणि मिरासदार किवा रयत यांच्यामध्येही 'कौलनामा' अथवा 'करार' झाल्याचे दिसते.

या कौलनाम्यातील महत्त्वाचे कलम म्हणजे, लागवडीखाली असलेल्या गावच्या जमिनीचे अव्वल, दुम, सीम, चारहम अशी जमिनीची प्रतावारी करणे. त्यानंतर जमिनीतून कोणते पिक येते. एकच पिक येते की दोन आणि प्रत्येक बिघ्यात साधार काय पिक येते, याची माहिति गोळा करणे. अधिका–याने सरकारला अशीही माहिती पुरवावी की एखाद्या जमीनीच्या तुकडयावर अधिक कष्ट केले, तर त्याचे उत्पन्न अंदाजे किती वाढेल. तसेच मलिक अंबर पध्दतीत किती उत्पन्न येत होते, याचीही नोंद करावी. या प्रकाराला 'पिक पाहणी' असे म्हणत. या पिक पाहणीमध्ये गावक–यांचा सहभाग आणि सारा आकरणीनंतरही त्यामध्ये बदल करण्याची व्यवस्था असल्याने शेतक–यावर अन्याय होण्यास वाव नव्हता. पिक पाहणीनंतर प्रत्येक गावच्या अशा नोंदी करून परगण्याचे संपूर्ण अंदाजपत्रक तयार होत असत. नंतर हे अंदाजपत्रक मंत्र्याकडे छाननीसाठी पाठवावे लागे. आपल्या अधिका–याने त्याच्यावर सोपविलेले कार्य प्रामाणिकपणे केले किंवा नाही, हे पाहण्यासाठी संबंधित मंत्री त्याची चाचणी घेण्यासाठी तीन गावाची निवड करीत असे. त्यापैकी एक डोंगराळ जमिनीचे, एक खाचर जमिनीचे आणि एक काळया जमिनीचे असेल. त्याचप्रमाणे या प्रकारच्या जमिनीच्या सरहद्दीस लागून असलेल्या खेडयाचाही विचार करतील. अशी परीक्षा करून मंत्री आपला निर्णय देतील. या निर्णयामुळे जमिनीच्या धा–यात काही प्रमाणात वाढ होईल, ते मान्य करून त्याप्रमाणे वसूल करणे. यास 'सारा आकारणी' म्हणतात. 'बिघावणी', 'पिक पाहणी' आणि 'सारा आकारणी' हे महसूल पध्दतीतील तीन महत्त्वाचे टप्पे होत.[14]

मेजर जर्व्हिसने देखील कोकणातील भात शेतीचे तिच्या प्रतवारीनुसार बारा प्रकारचे वर्गिकरण दिले असून सुरूवातीच्या अव्वल, दूम, सीम आणि चारुम किंवा चारसीम या पहिल्या प्रतीच्या जमिनीवर जास्त सारा, तर क्रमाक्रमाने कनिष्ठ प्रतीच्या जमिनीवर कमी सारा आकारला जात असल्याचे दिसते. सारा आकारणीच्या सवलतीमुळे खडकाळ जमीन गरीब शेतक–यांनी लागवडीखाली आणली ती भात शेतीला अनुकूल ठरली. त्यामुळे जमिनीची मागणी वाढत जाऊन कालांतराने सर्व प्रकारची माळराने लागवडीखाली आली. अशा जमिनीवर सुरूवातीला शेत सारा माफ असे, कालांतराने त्यावरही माफक सारा आकारला जात असे.[15]

सारा आकारणी करताना पिकांचा विचार करून निरनिराळया प्रकारच्या पिकांवर निरनिराळे दर आकारले जात. सारा आकारणीसाठी सरकारच्या दफ्तरात लागवडीखालील जमीन, तीत येणारी पिके आणि अंदाजे उत्पन्न या सर्वांची माहिती असावी लागे.

बिघावणी प्रत्येक वर्षी होत नसे, पण कोणी तक्रार केल्यास तेवढयापुरती मोजणी करून याप्रमाणे दफ्तर दुरूस्त केले जाई. काही वेळी शेतकरी अशी तक्रार करीत असे की, अधिका—यांनी सारा आकारणीसाठी गावच्या लागवडीखालील जमिनीव्यतिरीक्त इतर जमीन विचारात घेतल्याने आणि आपल्या शेतातील पिकाखाली असलेली जमीन अधिक दाखविल्यामुळे अधिक सारा भरावा लागतो. अशावेळी पडजमीन आणि पिकाखालील जमीन किती आहे, याची चौकशी करून तक्रारीत तथ्य आढळल्यास पाटलास गावच्या दफ्तरात दुरूस्ती नोंद करण्याचा आदेश दिला जाई. राज्य वृध्दीसाठी शेतक—यांकडून सारा घेणे आवश्यक असले, तरी तो अधिकचा असू नये व त्याची वसूली करताना शेतक—यास त्रास होऊ नये, याची दक्षता महाराज घेत असत. प्रत्येक बिघ्यामागे सरकारी सा—याचे प्रमाण किती होते, यासंबंधी सभासद म्हणतो,

''बिघेयास पिकाचा आकार करून पांच तक्षिमा (शग) पिकाचे करून तीन तक्षिमा रयतेस द्याव्या.
दोन तक्षिमा दिवाण्यात घ्याव्या, येणे प्रमाणे रयतेपासून घ्यावे.''[16]

यावरून एका बिघ्यामागे उत्पादनाचे पाच भाग करून दोन भाग सरकारने घ्यावे. तीन भाग रयतेस द्यावे, म्हणजे सा—याचे प्रमाण हे बहुधा उत्पन्नाच्या 2/5 (40%) इतके असावे. नख्त आणि ऐन जिन्नसी अशा दोन्ही स्वरूपात सारा घेतल्या जात असे. 'राजभाग पचादुई' असा उल्लेख एका कागदात आहे. नख्त दर कसे ठरविले जात असे, हे साधनाअभावी सांगणे कठीण आहे, पण या दराचा उत्पन्नाशी संबंध असावा असे स्थूलमानाने म्हणता येईल. नख्त दर हे सामान्यतः बागाईत जमिनीतील पिकावर आकारले जात होते. पैसे घेऊन हे जिन्नस शेतकरी बाजारात विकत असल्याने नख्त सारा रूपाने त्यांना कठीण जात नसावे. ऊस, सुंठ, हळद, भाजीपाला आणि फळफळावळे यावर नख्त दर आकारल्याचे दिसून येते, तर काही ठिकाणी बटाईचा (उत्पन्नाचा काही भाग)प्रयोग केला जात असावा.[17] मात्र,'' या बटई पध्दतीमुळे रयतेवर अधिक भार पडणार नाही, जुलूम होणार नाही. याची काळजी घ्यावी आणि शेतीच्या उत्पन्नात रयतेचा वाटा जो ठरला असेल, तो रयतेला मिळेल आणि राजभाग (राजाचा हिस्सा—सारा) आपणाकडे येईल असे वर्तन करावे. रयतेवर एक काडीचाही जुलूम अथवा गैरवर्तन केले तर साहेब तुमच्यावर नाराज होतील, हे पक्के समजावे.'' अशी शिवाजी महाराजांची आपल्या अधिका—यांना सक्त ताकीद असे. या संदर्भात ते प्रभानवल्लीच्या रामाजी अनंत सुभेदाराला पत्राव्दारे आदेश देतात की, ''रयतेकडून भाजीच्या एका देठाचीही अपेक्षा न करता तू रास्त आणि बिनचूक वर्तन केले पाहिजेस.''[18] पत्रातील या मजकूरावरून शिवाजी राजांना आपल्या अधिका—यांचे रयतेसोबत कसे वर्तन अपेक्षित होते, याची कल्पना येते.

शिवकाळात सारा वसूली ही धान्य आणि पैशाच्या रुपाने केली जावी, असा आदेश असला तरी काही वेळा अधिकारी धान्याच्या रुपाने वसूल घेण्यास टाळाटाळ करीत असे. धान्याचे पैशात रुपांतर करून रयतेकडून पैसा घेत. त्या काळात नाणे पध्दती इतकी रुढ नसल्याने पैशाच्या रुपाने सारा भरणे शेतक—यांच्या जिकरीचे होई, शिवाय 'पिकते तेथे विकत नाही' या न्यायाने उत्पादनाच्या ठिकाणी वस्तुचे भाव कमी असणार उदा. कोकणातील नारळ

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

आणि सुपारी, या वस्तुच्या रुपाने न करता त्या वेळच्या बाजारभावाने त्या मालाची किंमत घेतली, तर हाताशी फारसे लागणार नाही, परंतु त्याच वस्तुंचा साठा करून त्याची विक्री देशावर केली, तर तेथे त्या वस्तू पिकत नसल्याने त्यांना चागला भाव मिळेल व सरकारचा त्यामुळे फायदा होईल. मागणी, पुरवठा आणि वस्तुंचे भाव हा अर्थशास्त्रातला साधा सिध्दांत शिवराय जाणून होते. हा सिध्दांत आपल्या अधिका—यांना त्यांनी समजावून सांगताना.''रयतेकडून सारा हा सर्वत्र धान्याच्या रुपाने घ्यावा, रोकड रुपाने ते घेत जाऊ नये. येन जिनसच वसूल घेऊन जमा करीत जाणे आणि मग वेळचे वेळेस अशा कौशल्याने त्याची विक्री करावी की, ज्यायोगे ती महाग दराने विकली जाईल आणि त्यामुळे साहेबांचा फायदा होईल, वसूल हंगामशीर घ्यावा आणि साठवण करून ठेवावा. कोणत्या हंगामात कोणती जिन्नस विकल्याने फायदा होईल ती जिन्नस विकावी. असे केल्याने एकतर माल पडून राहणार नाही आणि विक्री महाग दराने होईल. नारळ, सुपारी, मिरे, यांची विक्री अशा कौशल्याने करीत जाणे.''[19] या पध्दतीने शिवरायांनी धान्य रुपाने सारा घेतल्याने सारा भरणे शेतक—यांना सुलभ झाले, तर ते धान्य योग्यवेळी विकल्या जात असल्याने त्यातून राज्यास अधिक फायदा होत असे. तत्काळात शेतक—यांचे दोन शत्रू होते. दुष्काळ, महापूर, वादळ, रोगराई यासारखी नैसर्गिक आपत्ती किंवा शत्रूचे आक्रमण, यामुळे पिकांचे नुकसान झाले असल्यास प्रत्यक्ष पिकाचा अंदाज घेऊन लोकांना सारा आकारणीतून सुट देण्याची पध्दत शिवाजी महाराजांनी स्वीकारल्याने त्यांची व्यवस्था ही लोकाभिमुख झाल्याचे दिसते. [20]

## निष्कर्ष :

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्य आणि रयतेच्या कल्याणाच्या आड येणा—या वतनदार मंडळीला 'वेतनदार' बनवून त्यांचा बंदोबस्त केला. आज्ञापत्रात म्हटले आहे की, ''खजिना म्हणजे राज्याचे जीवन,''[21] तेव्हा या राज्याच्या जीवनाचा मूलाधार हा शेतकरी आहे, लक्षात घेऊन प्रशासनाच्या माध्यमातून राज्यात माजलेले अराजक मोडून रयतेमध्ये विश्वास निर्माण केला. शेतक—यांना दुष्काळ आणि परचक्राच्या काळात सारा वसूलीत सूट देण्याचे धोरण स्वीकारले आणि शेतसारा आकारणी ही लवचिक आणि वर्षावर्षाला बदलत असल्याने शेतक—यावर झालेला अन्याय दूर होऊन उत्पादनात वाढ झाली. आपल्या 'बळीचे राज्य' या संकल्पनेतून रयतेचा उत्कर्ष हेच अर्थव्यवस्थेचे ध्येय असायला पाहिजे. हे राजकीय तत्त्व शिवाजी महाराजांनी तत्कालीन सत्ताधिका—यांसह आजच्या सत्ताधिका—यांनाही शिकविले. आपल्या राजकीय आदेशाच्या अंमलबजावणीतून लहानमोठया अधिका—यांमध्ये रयतेसोबत अन्यायाचे वर्तन केले, तर चौकशी हाऊन आपणास शिक्षा होईल असा धाक निर्माण केला. परिणामी बळीचे राज्य निर्माण होऊन त्याचा फायदा राज्याच्या आर्थिक स्थैर्यासोबत तत्कालीन रयतेला 'राजा आपल्या कल्याणाची चिंता करतो', या त्यांच्या अनुभवात झाला. या अनुभवाने सर्व जातीधर्मातील रयतेने स्वराज्याच्या झेंडयाखाली एकत्र येऊन स्वतःहून स्वराज्याच्या जबाबदारीत बांधून घेतले. त्यामुळे राजा आणि त्याचे प्रशासन जनतेचे कल्याण साधणारे असेल, तर जनता सर्व मतभेद विसरून त्यांच्या पाठिशी एकदिलाने उशी राहते आणि राजा आणि प्रजा जर एकत्र असेल, तर काय होऊ शकते, याची प्रचिती पुढील काळात औरंगजेबाविरूध्दच्या

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

स्वातंत्र्य संग्रामात दिसून आली. याचे श्रेय शिवाजी महाराजांच्या ध्येय–धोरणास द्यावे लागते. त्यामुळे इतिहासाचा वर्तमानकाळाशी संबंध जोडला नाही, तर त्याची उपयोगिता सिध्द होत नाही. तेव्हा शिवाजी महाराजांनी निर्माण केलेला इतिहास हा सदासर्वकाळ नेहमीच राज्य संस्थेसाठी दिपस्तंभाचे कार्य करणारा असल्याने आजच्या राज्यकर्त्यांनी त्यांच्या ध्येय धोरणाची अंमलबजावणी केल्यास शेतक–यांचे प्रश्न सुटण्यास मदत होईल, असा विश्वास वाटतो.

## संदर्भ सूची


1. डॉ. पवार जयसिंगराव, शिवचरित्रापसून आम्ही काय शिकावे, सुमेरू प्रकाशन, मुंबई, व्दितीय आवृत्ती, 2007 पृ. 08
2. डॉ. कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, 2004 पृ. 46
3. कुलकर्णी विजया, (अनु.) मराठयांची प्रशासन व्यवस्था, म. रा. सा. आणि स. मंडळ, मुंबई, 2001, पृ. 23
4. कुलकर्णी अ. रा., पूर्वोक्त, पृ. 120
5. भट श. वा., शिवाजीची राजनीती, इ. वि. का. मंडळ, धुळे, 2010, पृ. 120
6. कित्ता, पृ. 121
7. डॉ. पठाण यु. म., (संपा.) श्री शिवप्रभुंचे चरित्र अर्थात सभासद बखर, समर्थ प्रकाशन, औरंगाबाद, 1974, पृ. 21
8. डॉ. कुलकर्णी अ. रा., पूर्वोक्त, पृ. 52–53
9. कुलकर्णी विजया, पूर्वोक्त, पृ. 29
10. सरदेसाई गो. स., मराठी रियासत, ढवळे प्रकाशन, मुंबई, 1929, पृ. 221
11. डॉ. कुलकर्णी अ. रा., पूर्वोक्त,पृ. 46
12. कित्ता, पृ. 61–62
13. डॉ. कुलकर्णी अ. रा., पूर्वोक्त, 63
14. कित्ता, पृ. 63
15. कुलकर्णी विजया, पूर्वोक्त, पृ. 29
16. डॉ. कुलकर्णी अ. रा., पूर्वोक्त, 63
17. कुलकर्णी विजया, पूर्वोक्त, पृ. 23
18. डॉ. पवार जयसिंगराव, पूर्वोक्त, पृ. 63
19. कित्ता, पृ. 64
20. प्रा. गायकवाड व इतर, मराठेकालीन संस्था व विचार, फडके प्रकाशन, 1990, पृ. 242
21. डॉ. काकडे न. अ.,छत्रपती शिवरायांची अस्सल पत्रे, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, 2011, पृ. 89


 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.